ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP) तत्वज्ञान व तर्कशास्त्रातील विविध अभ्यासपद्धतींची प्रस्तुतता

* डॉ. सुनील ब. भोईटे,

* सी. टी. बोरा कॉलेज, शिरूर

**सारांश :**

*आज आपण काहीसे पारंपारिक पद्धतीने शिक्षण घेत आणि देत आहोत. त्यामधून आधुनिक शिक्षणाच्या गरजा पूर्ण होताना दिसत नाहीत असा एक सूर कायम दिसून येतो. कौशल्याधारित शिक्षणाची उणीव अनेक ठिकाणी जाणवते. नैतिकतेचे शिक्षण असते पण ते रोजगाराची गरज पूर्ण करू शकत नाही. तर दुसऱ्या बाजूला तांत्रिक शिक्षण असून त्या विद्यार्थ्याला भावनिकतेशी वा नैतिकतेशी स्वत:ला जोडून घेता येत नाही. विचार करण्यावर मर्यादा येतात. योग्य, समाजोपयोगी व नैतिक अधिष्ठान असलेले संशोधन करून त्याचे उपयुक्ततामूल्य वाढवण्याचे मार्ग त्या संशोधनकर्त्याला ज्ञात असतीलच असे नाही. विज्ञानाच्या विद्यार्थ्याला कला शाखेत शिकवलेली नैतिक मूल्ये, चिकीत्सक अभ्यासपद्धती, समतेचे तत्व या गोष्टी समजणे दुरापास्त आहे. सध्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI – Artificial Intelligence) हा शब्द आपणा सर्वांच्या कानावर पडतो आहे. गुगलवर जे शोधले तेच 'अंतिम सत्य' मानण्याची चूक घडण्याची दाट शक्यता आहे. सत्य व असत्य किंवा योग्यायोग्यतेमधून निश्चित व नैतिक निर्णय घेता येणे आवश्यक आहे. यासाठी कला, वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र या भिंती ओलांडून प्रत्येकाला परिपूर्ण व सर्वसमावेशक शिक्षण मिळण्याची हमी देणारे शिक्षण हेवे आहे. ते मिळण्याची अनुकुलता आता येऊ घातलेल्या नवीन शैक्षणिक धोरणात दिसत आहे.*

**महत्त्वपूर्ण शब्द:** *सॉक्रेटीस, चिकीत्सक, द्वंद्वात्मक विकास*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट:

1. एखाद्या व्यक्तीच्या बौद्धिक, सौंदर्यवादी, सामाजिक, शारीरिक, भावनिक, नैतिक आणि नैतिक पैलूंचा एकात्मिक पद्धतीने विकास करणे. त्याद्वारे देशाच्या विकासात थेट योगदान देणे आणि भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे.
2. 2030 पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात बहुविद्याशाखीय शिक्षण केंद्र स्थापन करणे.
३. एखादी बहुविद्याशाखीय संस्था केवळ वेगवेगळे विभागच नसावेत, तर विद्यार्थ्यांची विचारसरणी आणि शिकण्याची क्षमता वाढवण्यासाठी आणि उदयोन्मुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी बहु आणि आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे नाविन्यपूर्ण कार्यक्रम असले पाहिजेत.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

“अनो भद्रा कृतव्यो यांतु विश्वता:” ही ऋग्वेदातील एक संकल्पना याचा अर्थ असा कि सर्व दिशांमधून एक आदर्श विचार येऊ द्या. वैदिक कालखंडातील हा विचार बहुविद्याशाखीय शिक्षणाला मान्यता असल्याचे स्पष्ट करते. शिक्षण हे मर्यादित नव्हते तर ते विविधांगी व परिपूर्ण असे होते असे निदर्शनास येते. उदाहरणादाखल असे म्हणता येइल कि पूर्वी नालंदा आणि तक्षशिला यांसारख्या प्राचीन संस्थांद्वारे भारतातील लोकांना प्राचीन काळापासून बहुविद्याशाखीय दृष्टिकोनाची समृद्ध परंपरा आहे. प्राचीन भारतातील या उच्च शिक्षण केंद्रांनी गायन, वादन, चित्रकला, रसायनशास्त्र, गणित यासारख्या ज्ञानाच्या विविध शाखा शिकवण्यासाठी उपलब्ध करून दिल्या होत्या; व्यावसायिक क्षेत्रे जसे की: औषध आणि अभियांत्रिकी; आणि सुतारकाम, कपडे बनवणे, संवाद, चर्चा आणि वादविवाद यासारखी सॉफ्ट स्किल्स देखील शिकवली जात होती. पुढे मात्र शतकानुशतके व्यापक शिक्षणाच्या संधी संकुचित होत गेल्या आणि पुढील कालखंडात हळूहळू प्रत्येक विषयांच्या विशेषीकारणाकडे (Specialization) लक्ष वळवले गेले. ज्याचा परिणाम असा झाला कि विशिष्ट अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थांची वाढ झाली व वेगवेगळ्या विषयांच्या अभेद्य भिंती उभ्या राहिल्या ज्या पुन्हा एकत्र येणे कठीण होऊन बसले.

आजच्या काळात व वैदिक काळात देखील तत्वज्ञान व तर्कशास्त्र या विषयामधील विविध मुलभूत संकल्पना संशोधनाला चालना देताना दिसतात. आज मात्र त्या केवळ कला शाखेपर्यंत मर्यादित आहेत. संशोधनाचे क्षेत्र हे कला शाखेबरोबरच वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र यामध्ये देखील खूप मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे व विस्तारताना दिसते. त्यामुळे आंतरविद्याशाखीय दृष्टीकोणातून तत्वज्ञान व तर्कशास्त्र यामधील मुलभूत संकल्पनांच्या माध्यमातून विज्ञान व वाणिज्य शाखेत देखील संशोधनाला पूरक संशोधन पद्धती देता येतील. त्या दृष्टीने तत्वज्ञान व तर्कशास्त्राच्या अभ्यासकांनी व संशोधकांनी संधी म्हणून याकडे पहायला हवे. विज्ञान व वाणिज्य शाखांना नैतिक, तार्किक, चिकित्सक दृष्टी हवी आहे ती दृष्टी पुरविण्याचे काम तत्वज्ञान व तर्कशास्त्र करू शकेल. तत्वज्ञान व तर्कशास्त्रातील सोक्रेटीसची संवाद पद्धती, हेगेलची द्वद्वात्मक विकास पद्धती, चिकीत्सकपणे निर्णय घेण्याची पद्धती (क्रिटिकल थिंकिंग), वैगमनिक व नैगमनिक तर्कशास्त्र, तर्कदोष, तर्कद्वेष या व इतर संकल्पना कलाशाखेबरोबरच विज्ञान व वाणिज्य तसेच स्थापत्य व अभियांत्रिकी, मेडिकल यांना देखील आवश्यक आहे. त्यामुळे आपण आपल्या तत्वज्ञान व तर्कशास्त्राचे ज्ञानक्षेत्र विस्तारू शकतो.

**सॉक्रेटीसची संवादपद्धती:**

ज्या ठिकाणी काही माणसे जमलेली असतील अशी ठिकाणे तो शोधात असे. जिथे लोकांच्या गप्पागोष्टी चाललेल्या असतील अशा सार्वजनिक वा बाजारपेठेसारख्या ठिकाणी, तसेच जिथे विशेषत: तरुणवर्ग असेल अशा व्यायामशाळांसारख्या ठिकाणी जाऊन सॉक्रेटीस विविध प्रश्नोत्तरे स्वरुपात संवादाला सुरवात करीत असे. सर्वप्रथम तो आपल्याला ज्ञान नाही अश्या भूमिकेतून संवादाला सुरु करी. ज्यांच्यापाशी ज्ञान आहे त्यांच्याकडून आपल्याला ते ज्ञान शिकायचे अथवा मिळवायचे आहे अशी भूमिका घेऊन तो लोकांशी संवाद साधत असे. त्यांना तो प्रश्न विचारीत असे आणि नैतिक संकल्पनांबद्दल आपल्याला पक्के ज्ञान आहे, अशा भ्रमात असणाऱ्यां

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

लोकांना तो त्या संकल्पनांबद्दलचा त्यांचा जो वैचारिक गोंधळ झालेला आहे तो गोंधळ निदर्शनास आणून देत असे. यासाठी पुढील एक उदाहरण घेऊ.

सॉक्रेटीस संवादाची सुरुवात एखाद्या प्रश्नाने करीत असे, जसे 'धैर्य' म्हणजे नक्की काय ? अश्या एख्याद्या संकल्पनेबाबत तो प्रश्न समोरील माणसांना विचारीत असे. त्यावर ज्यांना निश्चितपणे धैर्याबाबतची जी अशी कृत्ये असतात ती सांगून त्यांच्या आधारे उत्तर देणारा श्रोता धैर्याची एक व्याख्या करीत असे पण तिथे असे दिसून येत असे कि ज्यांना धैर्याची कृत्ये म्हणता येणार नाही, अशी काही कृत्येही ह्या व्याख्येत बसतात असे सॉक्रेटीस दाखवून देई. साहजिकच तो श्रोता आपल्या व्याख्येला योग्य ती मुरड घाली पण ही सुधारित व्याख्याही अडचणी निर्माण करते असे जेव्हा सॉक्रेटीस दाखवून देई, तेव्हा त्याही व्याख्येला मुरड घालावी लागे किंवा नवीन व्याख्या करावी लागे. अखेर 'धैर्य' ह्या संकल्पनेबाबत आपल्या मनात गोंधळ आहे, हे श्रोत्याच्या लक्षात येई व शेवटी एक सर्वमान्य अशी योग्य व्याख्या तयार होत असे. सॉक्रेटीसच्या या संवादपद्धतीला द्वंद्वात्मक विकास पद्धती (Dialectic Method) असेही म्हटले जाते.

मानवी जीवन सफल करणारी काही वस्तुनिष्ठ मूल्ये आहेत. त्यांचे ज्ञान होऊ शकते, अशी सॉक्रेटीसची धारणा होती. पण त्यासाठी मन पूर्वग्रहदूषित असता कामा नये आणि स्वत:च्या मताची व इतरांच्या मतांची आपण चिकित्सक दृष्टिकोनातून परीक्षा केली पाहिजे, असा चिकित्सक विचार करावयाला लोकांना प्रवृत्त करणे असे सॉक्रेटीसचे विचार होते. यासाठी त्याने उपरोधाचा, ('irony') म्हणजे श्रोत्यांच्या उलटतपासणीचा प्रयोग केला. सॉक्रेटीस स्वत:कडे अज्ञानी माणसाची भूमिका घेऊन समोरच्याकडून माहिती घेण्यासाठी जे प्रश्नोत्तराचे तंत्र अवलंबीत होता, त्यालाच 'सॉक्रेटीसचा उपरोध' ('Socratic irony') असे म्हटले जाते.

सॉक्रेटीसची ही ज्ञान प्राप्तीची किंवा संपादनाची पद्धती सर्व शाखांमधील सर्व विषयांना उपयोगी आहे हे आपण तत्वज्ञानाच्या अभ्यासकांनी इतर शाखांना निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

याबरोबरच तर्कशास्त्रातील विवध संकल्पना जसे कि विचार आणि विचार प्रक्रिया पुढे विचार प्रक्रियेचे प्रकार याचे ज्ञान इतर शाखांना आवश्यक आहे ते आपणास पुरवता येईल. अनुमान संकल्पना, अनुमानाचे विगमन निगमन प्रकार संशोधन कार्यात कसे उपकारक ठरतात व सर्जनशील ज्ञाननिर्मितीमध्ये कशी भूमिका बजावतात हे दाखवून देणे उपयोगी ठरेल. विचार कसा करू नये यासाठी तर्कदोषची ओळख संशोधनकार्य करणाऱ्याला असणे आवश्यक आहे ती तत्वज्ञान व तर्कशास्त्राचे अभ्यासक म्हणून आपणास करून देता येईल.

विधार्थी शिक्षण घेऊन एखादी नोकरी मिळवितो. पण प्रत्यक्ष त्याला नोकरीवर रुजू झाल्यावर तो जेव्हा प्रत्यक्ष कामाला सुरवात करतो तेव्हा त्याला चिकित्सक दृष्टी आवश्यक असते. ती दृष्टी पुरविण्याचे काम तर्कशास्त्र करते. प्रत्येक समोर येणारी परिस्थिती भिन्न भिन्न प्रकारची असते तेव्हा तिथे त्याचवेळी निर्णय घेणे आवश्यक असते. तो निर्णय घेण्यासाठी त्या व्यक्तीकडे पर्याप्त वेळ असेलच असे नाही. त्यामुळे त्या व्यक्तीचा निर्णयक्षम विकास झाला असेल तर तो विकास अथवा ज्ञान त्याला मदत करू शकेल. म्हणूनच त्याला

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

त्याची चिकित्सक विचार प्रणाली अधिक विकसित करावी लागेल ती तर्कशास्त्राच्या माध्यमातून शक्य आहे.

**चिकित्सक विचार पद्धती:**

चिकित्सक विचार यालाच आपण इंग्रजीमध्ये Critical Thinking असे म्हणतो. मुलांचा मेदू किशोरवयात अधिक सक्षम होत असतो. या वयात विकसित होत असणाऱ्या अनेक कौशल्यांपैकी 'चिकित्सक विचार पद्धती' हे एक कौशल्य आहे. यालाच आपण सारासार विचार करण्याचं कौशल्य असेही म्हणतो. आजच्या युवा पिढीला निरंतरपणे असा विचार करण्याची आवश्यकता भासते. समाज माध्यमांशी संवाद साधताना ही गरज जास्त जाणवते. समाज माध्यमं उपयुक्त आहेत, आवश्यक आहेत, सर्वव्यापी आहेत. हे सारे जरी खरे असले तरी देखील ती समाजमाध्यमे काही प्रमाणात बेबंद झाली आहेत. त्यांच्यामध्ये एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा नैतिक व चिकित्सक दृष्टीकोणाचा अभाव असल्याचे जाणवते. ही समाजमाध्यमे आपल्या नियंत्रणाच्या बाहेर आहेत असे दिसते. वाढत्या वयाच्या मुलांना या समाज माध्यमांपासून दूर ठेवणं अवघड होत आहे. माध्यमांसह मित्रमैत्रिणींचा दबाव, व्यसनं, करिअर प्लॅनिंग, नाती जपणं अशा किती तरी आव्हानांना तोंड देताना ही चिकित्सक विचारपद्धती उपयोगी पडते. ही आव्हानं आजच्या जीवनाचा अपरिहार्य भाग झाली आहेत. त्यांना तोंड द्यायला जे काही मर्यादित पर्याय आपल्याकडे आहेत, त्यातला एक म्हणजे बरं-वाईट, योग्य-अयोग्य काय याचा निवाडा करण्याचा विवेक मुलांना चिकित्सक दृष्टीकोणाच्या शिकणातून शिकवणं आवश्यक आहे. कुठल्याही गोष्टीकडं डोळे उघडे ठेवून कसं पाहावं, फेस व्हॅल्यूवरच कसं जाऊ नये, रियल लाइफ आणि रील लाइफ यातला फरक कसा ओळखावा, हे कळणं जगण्याच्या प्रत्येकबाबतीत उपयोगी ठरणार आहे.

मुलांना पाठांतरापेक्षा सारासार विचार करायला शिकविणे आवश्यक आहे. उदा. गांधीजींचा जन्म किती तारखेला झाला, असं विचारण्याऐवजी त्यांचा जन्म झाला नसता, तर तर इतिहास कसा बदलला असता. असे प्रश्न मुलांना विचार करण्यास उद्युक्त करतात. आपल्या कौशल्यावर नोकरी मिळविणे व ती टिकविणे आणि त्याबरोबरच यशस्वी करिअर करणे हे एक आव्हान असते. ते आव्हान स्वीकारायचं तर आपण काही विशिष्ट कौशल्यं आत्मसात करणे आवश्यक आहेत. ज्या माणसाला स्वतंत्नपणे योग्य निर्णय घेता येतात आणि त्यासाठी त्याला कधीही इतरांची मदत घ्यावी लागत नाही असा 'सुयोग्य निर्णय घेणारा माणूस' होणे आजच्या काळाची गरज आहे. असा माणूस आपणाला होणे नक्कीच आवडेल. या उलट प्रत्येक गोष्ट करू की नको करू असा विचार करणारा, यातून काय होईल आणि त्यातून काय घडेल अशी धाकधूक मनात बाळगणारा माणूस सतत कुणावर तरी अवलंबून राहील हे मात्र आपणास नको असते. 'क्रिटिकल थिंकर' कडे मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये नक्की काय करणे आवश्यक आहे याचं आकलन करून घेण्याची क्षमता असते. त्यानुसार तो योग्य निर्णयार्पयत पोहोचतो आणि निर्णय अंमलात आणतो. उपलब्ध असलेली माहिती, त्या संदर्भातल्या इतर गोष्टींची जाणीव आणि काहीवेळा मागे घडलेल्या घटनांचा अभ्यास हे सगळं त्याच्याकडे असते. थोडक्यात तो व्यक्ती कुणावर विसंबून न राहाता किंवा परिस्थितीला दोष न देता आत्मविश्वासाने मार्ग काढत पुढे जातो. खूप माहिती समोर असेल तर त्यामधलं नेमकं काय उपयुक्त आहे आणि काय बाजूला सारण्यासारखं आहे हे ओळखण्याची कला त्यानं साध्य केलेली असते.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

उदाहरण:

१) एखाद्या इस्पितळात एकाचवेळी खूप रुग्ण दाखल झालेले असतील तर त्यांच्यापैकी नेमकं कुणाकडे आधी लक्ष दिलं पाहिजे याचे आकलन निष्णात नर्सला अधिक लवकर लक्षात येते.

२) एखाद्या वकिलाला जेव्हा हे लक्षात येते कि, उपलब्ध असलेल्या पुराव्यांनिशी एखाद्या दाव्यासंबंधीचा खटला लढायचा का न्यायालयाबाहेरच परस्पर संमतीनं प्रकरण मिटवून टाकायचं हे तो हुशार वकील जाणतो.

३) ग्राहकांनी दिलेल्या अभिप्रायानुसार आपल्या कर्मचाऱ्यांनी कामकाजात काय सुधारणा केल्या पाहिजेत हे ओळखून त्यानुसार त्यांना प्रशिक्षित करण्यासाठीचं धोरण यशस्वी व्यवस्थापक आखतो.

'क्रिटिकल थिंकर' बनण्यासाठी अनेकदा आपल्यासमोरचा प्रश्न नीटपणे समजून घेण्यासाठी संबंधितांना प्रश्न विचारावे लागतात. उपलब्ध असलेल्या माहितीतून आपल्याला उपयोगी पडतील असे निष्कर्ष काढावे लागतात. निष्कर्षावर आंधळेपणानं विसंबून न राहाता त्यामधलं नेमकं काय घ्यायचं आणि काय बाजूला सोडायचं यासाठीची निर्णयक्षमता विकसित करावी लागते. या सगळ्या कामामध्ये अनेक लोकांशी संपर्क होत असल्यामुळे आणि त्यांच्यासोबत कामं करायची असल्यामुळे त्यासाठी आपली संवाद साधण्याची कला अधिक विकसित करावी लागते. निश्चित नेमके प्रश्न विचारणं, कुणाशीही सहजपणे संभाषण करू शकणं, कमी शब्दांमध्ये आपले इप्सित कार्य साधणं हे सगळं जोपासावं लागतं. कित्येकदा नेहमीच्या पठडीमधला विचार करून चालत नसल्यामुळे 'आउट ऑफ द बॉक्स' विचार करावा लागतो. तसेच कुतूहल, निरीक्षण अशा गोष्टी अश्यावेळी खूप उपयोगी पडतात. काय केल्यानं काय घडू शकेल याचे अंदाज बांधावे लागतात. खुल्या दिलानं व पूर्वग्रहरहित दृष्टीने सगळ्या शक्यतांचा विचार करावा लागतो आणि इतरांची मतं ऐकून घ्यावी लागतात. हे सगळं बुद्धिमत्तेच्या जोरावर साधता येत नसल्यामुळे भावनिक कौशल्येही महत्त्वाची व उपयोगी ठरतात. **त्यासाठीची मानसिक कौशल्यं कशी प्राप्त करावयाची हे देखील पाहणे आवश्यक आहे.**

- आपल्या मनात सतत विचार निर्माण होत असतात; पण जाणीवपूर्वक विचार आपण खूप थोडा वेळ करत असतो. त्यामुळे हेतुनिष्ठ व ठरवून विचार करणे हे एकप्रकारचे कौशल्य आहे.
- आपल्या विचार कौशल्यामध्ये स्मरणशक्ती फार महत्त्वाची नसते. मात्र कोणती माहिती आपल्याला आहे आणि आणखी कोणती अजून मिळवायला हवी आहे याचं भान मात्र सदोदित असणे आवश्यक असते.
- वेगवेगळ्या विषयातील जी माहिती आहे त्यांचा एकमेकांशी संबंध लावता येणं हे देखील एक महत्वाचे विचार कौशल्य आहे.
- विविध संकल्पना समजून घेऊन त्यामध्ये काय साम्य आहे आणि कोणते भेद आहेत हे ओळखता येणं आणि ते योग्य शब्दात व्यक्त करता येणं हे कौशल्य व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यातदेखील आवश्यक असतं.
- अशी कौशल्ये आपल्या सजगतेच्या सरावानं वाढतात.

- असं केल्यानं दोन किंवा अधिक संकल्पनातील साम्य आणि भेद समजू लागतात.
- विचार करण्याचं कौशल्य हे कोणतीही समस्या सोडवण्यासाठी, सर्जनशीलता विकसित होण्यासाठी आणि निर्णय घेतानादेखील उपयोगी ठरते.

एखादी गोष्ट साध्य करायची असेल तर त्यासाठी विविध पर्यायांचा विचार करणं अशा पद्धतीनं हे कौशल्य विकसित करता येतं. म्हणूनच तत्वज्ञान व तर्कशास्त्रातील सोक्रेटीसची संवाद पद्धती, हेगेलची द्वद्वात्मक विकास पद्धती, चिकीत्सकपणे निर्णय घेण्याची पद्धती (क्रिटिकल थिंकिंग), विगमन, निगमन, तर्कदोष या व इतर संकल्पना कलाशाखेबरोबरच विज्ञान व वाणिज्य तसेच स्थापत्य व अभियांत्रिकी, मेडिकल यांना देखील उपयुक्त आहेत त्यामुळे आपण सर्वहीतार्थ व सर्वसंपन्नतेस्तव तत्वज्ञान व तर्कशास्त्राचे ज्ञानक्षेत्र विस्तारू शकतो.

**सारांश:**

भारतामध्ये एकल विशिष्ट अभ्यासक्रमाधरीत महाविद्यालये आणि विद्यापीठे आहेत. बहुविद्याशाखीय उच्च शिक्षण संस्थांमध्ये देखील शिक्षणक्रमाच्या सीमा इतक्या कठोर आहेत की भिन्न विषय शिकण्याच्या संधी कमी आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर, बहुविद्याशाखीय विद्यापीठाची स्थापना आणि टिकून राहण्याची संस्कृती वेगाने वाढत आहे, ज्यामुळे संशोधन आणि विकासाकडे अधिक लक्ष केंद्रित करून उत्पादकता वाढवली जाते. त्यामुळे अशा उच्च शिक्षण संस्था निर्माण करून मूल्याधारित आणि कौशल्य प्रधान शिक्षण देता येणे शक्य आहे. पुनश्य एकदा वैदिक कालखंडातील अमर्याद शिक्षणाची बहुविद्याशाखीय शिक्षण पद्धती अंगीकारून विद्यार्थ्यांना परिपूर्ण बनविणे हा उद्देश ठेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) ची निर्मिती करण्यात आली आहे असे वाटते. त्यानुसार राष्ट्रीय, बहुविद्याशाखीय शिक्षण देण्यासाठीची अनेक धोरणे नवीन शैक्षणिक धोरणात सुचवली आहेत. अश्या प्रकारची उच्च शिक्षण प्रणाली अध्यापन, शिक्षण आणि संशोधनाच्या बाबतीत भारतीय संस्थांच्या कामगिरीला भारतीय व पाश्यात्य तत्वज्ञान, तर्कशास्त्राच्या माध्यमातून नवीन आणि मोठ्या उंचीवर नेईल असे म्हणता येईल. त्यातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची उद्दिष्ट सिद्धी होईल.

**संदर्भग्रंथ:**

- सदाशिव आठवले, (१९७४), भारतीय समाजविज्ञान कोश : २
- सं. स. मा. गर्गे, समाजविज्ञान मंडळ, पुणे
- दे. दि. वाडेकर, (१९७४), मराठी तत्वज्ञान विश्वकोश, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे,

**सर्वदर्शनसंग्रह:**

- ग.ना. जोशी, भारतीय तत्त्वज्ञानाचा ब्रहद इतिहास
- ग. ना. जोशी, पाश्यात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास खंड १ व २

- D. J. O'Connor, A Critical History of Western Philosophy
- Guidelines for Transforming Higher Education Institutions into Multidisciplinary Institutions, UGC, New Delhi


**Cite This Article:**

***डॉ. सुनील ब. भोईटे,(2022***) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP) तत्वज्ञान व तर्कशास्त्रातील विविध अभ्यासपद्धतींची प्रस्तुतता , ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No* XI *(Special Issue-I), 71-77.*